MHNG100014202025

दाखल तारीख : २६.०६.२०२५
नोंदणी तारीख : २६.०६.२०२५
निकाल तारीख : १५.०४.२०२६
कालावधी : ०० व. ०९म. २०दि.

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उमरेड यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी रा.भा. डोळे यांचे समक्ष)**

**नियमीत दिवाणी दावा क्र.९७/२०२५** **निशाणी क्र.३२**

**वादी** : १. **मालुताई खुशाल वाघमारे (लग्नानंतरचे नाव)**
**रत्नमाला कन्हैय्यालाल मेहर (लग्नापुर्वीचे नाव)**
वय – ३५ वर्ष, व्यवसाय – घरकाम,
राह. मिलन चौक, मंगळवारीपेठ उमरेड,
तह.उमरेड,जि.नागपुर.

..**विरुध्द**..

**प्रतिवादी** : १. **वेस्टर्न कोल फिल्ड लिमीटेड, उमरेड, तर्फे जनरल मॅनेजर**
डब्ल्युसीएल, तह.उमरेड, जि.नागपुर

---

**विधिज्ञ :** कु.के.एस.चिचघरे वादीतर्फे.
श्री पी.एच.रघुते प्रतिवादी तर्फे

---

**दावा : जाहीर घोषीत होऊन मिळण्याबाबत.**

**न्या य नि र्ण य**

**(पारित दिनांक १५ एप्रिल, २०२६)**

प्रस्तुतचा दावा हा जाहीर घोषीत होऊन मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

**वादीचे दाव्यातील वाद कथन पुढीलप्रमाणे थोडक्यात मांडता येईल.**

**दावा** :

२. वादी ही मंगळवारी पेठ, उमरेड येथे राहते. त्यांची संयुक्त मालकीची हेवती येथे सर्वे न.१९२/२ क्षेत्र १.२१ हे.आर आहे. वादीचे लग्नापुर्वीचे नाव रत्नमाला कन्हैय्यालाल मेहर होते. त्यांनी खुशाल वाघमारे यांच्यासोबत लग्न केले. लग्नापुर्वी वादी ही मोहगांव देवी ता.मोहाडी, जि.भंडारा येथे राहत होती. तिचे लग्न दि.१५.०५.२०१० रोजी झाले. त्यानंतर रीवाजाप्रमाणे तिचे नाव मालुताई खुशाल वाघमारे असे झाले.

३. प्रतिवादी यांनी शेतजमीन अधिग्रहीत केली आहे. वादीचे शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रकामध्ये तिचे नाव रत्नमाला कन्हैय्यालाल मेहर असे नमुद आहे. आधार कार्ड, पॅन कार्ड व ७/१२ वर मालुताई खुशाल वाघमारे असे नमुद आहे.

४. त्यामुळे वादीचे नावाची घोषणा होण्यासाठी वादीला विद्यमान कोर्टात सदर दावा दाखल करणे भाग पडले आहे. वादीने सदर दाव्याशिवाय इतर कुठेही नावाची घोषणा होण्याबदल दावा दाखल केलेला नाही तसेच दावा प्रलंबित सुध्दा नाही. सबब त्यांनी दावा मंजुर करावा अशी विनंती केली.

**प्रतिवादी यांची कैफियत** :

५. प्रतिवादी यांनी नि.क्र. ९ अन्वये कैफियत दाखल केली. त्यांनी दाव्यातील सर्व मजकुर विवक्षीतपणे नाकारला. कोणतेही दस्त अभिलेखावर दाखल नाही. दावा कायदेशीर

नाही. सबब, दावा खारीज करण्यात यावा, अशी विंनती केली.

६. न्यायालयाने नि.क्र. १० अन्वये मुद्दे निश्चित केले. मी ते मुद्दे चर्चेकरीता खालीलप्रमाणे नमुद करित असून, त्यावर कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे जाहीर घोषीत होऊन मिळण्यास पात्र आहे काय ? | **होय** |
| २. | दाव्यास कायद्याचा रोध आहे काय ? | **नाही** |
| ३. | काय आदेश व हुकूमनामा ? | **अंतीम आदेशा प्रमाणे** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**७.** वादी यांनी त्यांच्या मुद्दे पृष्ठ्यर्थ नि.क्र. ११ अन्वये स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यानंतर वादी यांनी खुशाल बबनराव वाघमारे यांचे शपथपत्र नि.क्र. २२ अन्वये दाखल केले आहे. वादी यांनी नि.क्र. २३ अन्वये पुरसीस दाखल करुन दि. २०.०१.२०२६ रोजी त्यांचा पुरावा बंद केला. त्या व्यतिरिक्त त्यांनी त्यांची भिस्त खालील दस्तांवर ठेवली आहे. प्रतिवादी यांनी दिलेले पत्र नि.क्र.१५ अन्वये दाखल आहे. वादीचे आधारकार्ड नि.क्र.१६ अन्वये दाखल आहे. वादीचे पॅन कार्ड नि.क्र.१७ अन्वये दाखल आहे. राजपत्र नि.क्र.१८ अन्वये दाखल आहे. विवाह नोंदणी प्रमाणपत्र नि.क्र.१९ अन्वये दाखल आहे. शाळा सोडल्याचा दाखला नि.क्र.२० अन्वये दाखल आहे. ७/१२ नि.क्र.२१ अन्वये दाखल आहे. इत्यादी

दस्तांवर त्यांनी भिस्त ठेवली.

८. प्रतिवादी यांनी नि.क्र.२४ अन्वये पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला. त्यांनी पुरावा दिला नाही. त्यानंतर वादी यांनी नि.क्र. २५ अन्वये अर्ज दाखल करुन दस्तावेज दाखल केले. त्यानंतर नि.क्र. २७ अन्वये दस्तावेज दाखल केल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी सदरचे दस्त कबुल केल्याचे दिसून येते. ते दस्त नि.क्र. ३० अन्वये अभिलेखावर दाखल आहे.

**<u>मुद्दा क्र. १ व २ साठी –</u>**

९. वादी यांनी दाव्याशी सुसंगत असे शपथपत्र दाखल केले. तसेच त्या पृष्ठर्थ त्यांनी उपरोक्त नमुद दस्तावेज दाखल केले. या ठिकाणी मी वादी यांची उलटतपासणी मधील काही कबुली नमुद करीत आहे. वादी यांनी कबुल केले की, आधारकार्ड, पॅनकार्ड व ७/१२ वर मालुताई उर्फ रत्नमाला असे लिहीलेले नाही. या व्यतिरीक्त त्यांनी प्रतिवादी यांचे कथन साफपणे नाकारले. वादी यांचे साक्षीदार यांनी देखील वादी यांना सुसंगत अशी साक्ष नोंदविली.

१०. वादी यांनी शपथपत्रात असे नमुद केले की, महसुल अभिलेखावर त्यांचे नाव मालुताई खुशाल वाघमारे असे आहे व शालेय दस्तावेजावर रत्नमाला कन्हैय्यालाल मेहर असे नमुद आहे. त्यासाठी त्यांनी शासननिर्णय मध्ये त्यांचे नाव प्रकाशीत केले आहे. नि.क्र. १८ अन्वये ते दस्त दाखल आहे. नि.क्र.१९ हे विवाह नोंदणी प्रमाणपत्र आहे. त्यामध्ये वादी यांचे नाव मालुताई कन्हैय्यालाल मेहर असे नमुद आहे. नि.क्र. १६ चे अवलोकन केले

असता, त्यामध्ये मालुताई खुशाल वाघमारे असे नाव नमुद आहे. ते आधारकार्ड आहे. नि.क्र.१७ हे पॅनकार्ड आहे. त्यामध्ये मालुताई खुशाल वाघमारे असे नमुद आहे. वडीलांचे नाव कन्हैय्यालाल मेहर असे नमुद आहे.

**११.** नि.क्र.१८ चे अवलोकन केले असता, ते महाराष्ट्र शासनाचे राजपत्र आहे. त्यामध्ये हे जाहीरपणे राजपत्रात घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे रत्नमाला कन्हैय्यालाल मेहर व मालुताई खुशाल वाघमारे या दोन्ही एकच व्यक्ती आहे. असे अभिलेखावरुन दाखल दस्तावरुन दिसते. नि.क्र.२१ हा ७/१२ उतारा आहे.

**१२.** सा.क्र.२ यांनी देखिल उलटतपासात कबूल केले की, मालुताई उर्फ रत्नमाला असे दस्तऐवज त्यांनी अभिलेखावर दाखल केले नाही. तसेच त्यांनी देखिल मालुताई उर्फ रत्नमाला असे दस्तऐवज तयार केले नाही. दावा हा नि.क्र.१५ अन्वये प्रतिवादी यांनी दिलेल्या पत्रामुळे दाखल करण्यात आलेला आहे. तसेच नि.क्र. ३० अन्वये देखील पत्र दाखल केलेले आहे. त्यामध्ये न्यायालयाचा हुकुमनामा आणावा, असे वादी यांना कळविण्यात आले. त्यांच्या नावामध्ये लग्नानंतरचे व लग्नापुर्वीच्या नावात बदल होता, असे अर्जात नमुद आहे. नि.क्र. १८ अन्वये वादी यांनी राजपत्र दाखल केले आहे. नि.क्र. २० अन्वये शाळा सोडल्याचा दाखला दाखल आहे. प्रस्तावाच्या त्रुटीबाबत प्रतिवादी यांनीच पत्र दिल्याने दावा दाखल करण्यात आला. त्यामुळे दावा तुर्त तरी मदतीत आहे. त्यास फर्मानची आवश्यकता नाही, कारण प्रतिवादी यांनीच सदरची त्रुटी बाबत कारवाई करण्यासाठी करावी असे पत्र नि.क्र. ३० अन्वये

दिले आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ चा होकारार्थी व मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ साठी -</u>**

**१३.** वादी यांनी पुरावा दाखल केला आहे. त्यांनी त्यांच्यावर असलेल्या मुद्दयांचा भार हा प्राबल्याच्या शक्यतेवर शाबीत केल्याचा दिसून येतो. प्रतिवादी यानी पुरावा दिला नाही. त्यामुळे उभय पक्षकारांनी दाव्याचा खर्च स्वतः सहन करावा असेच सांगणे न्यायोचित आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे. सबब, मुद्दा क्र. ०४ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>: आदेश :</u>**

- वादीचा दावा मंजुर करण्यात येतो.
- मालुताई खुशाल वाघमारे व रत्नमाला कन्हैयालाल मेहर हे दोन्ही नाव एकाच व्यक्तीचे आहे, असे जाहीरपणे घोषीत करण्यात येते.
- उभय पक्षांनी आपआपला खर्च सोसावा.
- येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.
- न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आले.

RAJU BHASKAR DOLE
Judgment Digitally signed by RAJU BHASKAR DOLE Date: 2026.04.15 11:54:25 +0530

**उमरेड .** **(रा.भा. डोळे)**

**दिनांक : १५.०४.२०२६.** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड**

**नि.दि.दावा क्र. ९७/२०२५**

**मालुताई – विरुध्द – जनरल मॅनेजर**

**<u>: प्रमाणपत्र :</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – आ.ए. देशकर

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उमरेड .

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – १५.०४.२०२६.

स्वाक्षरीत/-

लघुलेखक श्रेणी -३